मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ नागपूर यांच्या आदेशानुसार पदस्थापनेमध्ये सुधारणा करणेबाबत. डॉ. यीसुदेव सखाराम वंजारी, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन आदेश क्रमांक - पसंप्र-२०१७/प्र.क्र.१३७/पदुम-१
५ वा मजला विस्तार, मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक :- ०९ मार्च, २०१८.

वाचा :- १. शासन आदेश क्र.पसंप्र-२०१६/प्र.क्र.३४५/पदुम-१,दि.३१.०५.२०१७,
२. सहआयुक्त पशुसंवर्धन(मुख्यालय) पुणे यांचे पत्र क्र. राजप-१/प्र.क्र.१७/कोर्ट केस/ डॉ. वंजारी/२००/२०१७/पसं-२, दि. २७/२/२०१८.

शासन आदेश :-

डॉ. यीसुदेव सखाराम वंजारी, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन यांनी त्यांच्या बदलीबाबत शासनाच्या दि.३१/५/२०१७ च्या आदेशाविरुध्द मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ नागपूर येथे दाखल केलेला मुळ अर्ज क्र.३००/२०१७ मध्ये मा.न्यायाधिकरणाने दि. १६/२/२०१८ रोजी न्यायनिर्णय पारित करुन डॉ. वंजारी यांनी शासनाकडे दिलेल्या निवेदनानुसार त्यांच्या पदस्थापनेमध्ये सुधारणा करण्याबाबत तीन महिन्याच्या आंत निर्णय घेण्याचे आदेश दिले आहेत. मा.न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार डॉ.वंजारी यांनी दिलेल्या निवेदनाचा शासन स्तरावर विचार करण्यात आला असून विचारांती, महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि प्रतिबंध अधिनियम २००५ मधील कलम ४(४) व ४(५) मधील तरतूदी नुसार सक्षम प्राधिकारी यांच्या मंजूरीने डॉ. यीसुदेव सखाराम वंजारी, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन यांच्या बदलीबाबत दि.३१.५.२०१७ च्या शासन आदेशामध्ये अंशत: बदल करुन त्यांना खालील विवरणपत्रातील स्तंभ क्र.३ मध्ये नमूद ठिकाणी पदस्थापना देण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नांव	मा.न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार सुधारीत पदस्थापनेचे ठिकाण
१	२	३
१.	डॉ. यीसुदेव सखाराम वंजारी, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, तालुका लघु पशुसर्व चिकित्सालय, साकोली, जि. भंडारा.	सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, तालुका लघु पशुसर्व चिकित्सालय, मोहाडी, जि. भंडारा.

२. संबंधित नियंत्रण अधिकाऱ्यांनी पर्यायी व्यवस्था करुन डॉ. यीसुदेव सखाराम वंजारी यांना कार्यरत पदावरुन तातडीने कार्यमुक्त करावे. तसेच डॉ.वंजारी यांनी वरीलप्रमाणे पदस्थापनेच्या पदावर विनाविलंब रुजू व्हावे.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१८०३०९१२५५१२९५०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vinod Sopanrao Mendhe

Digitally signed by Vinod Sopanrao Mendhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3dfd984bb7c5aede090473e34b1c93fa9f36d97d56c0cf07812a43c5ca5d6a24, cn=Vinod Sopanrao Mendhe
Date: 2018.03.09 12:55:15 +05'30'

(वि.सो.मेंढे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत :

१.आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-०७.

२. सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय) पुणे.
३. मुख्य सादरकर्ता अधिकारी, मा.महाराष्ट्र न्यायाधिकरण खंडपीठ नागपूर.
   (मूळ अर्ज क्रमांक ३००/२०१७).
४. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, नागपूर.
५. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, भंडारा/गडचिरोली.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, भंडारा/गडचिरोली.
७. संबंधित सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन द्वारा आयुक्त पशुसंवर्धन, म.रा.पुणे.
८. निवड नस्ती.